# छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९४१ । वर्ष २० अंक ६।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २८ अंक ८)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



# एक आम्ही होऊ...

अभिमानाने, अनासक्तीने, विश्वासाने, विनयवृत्तीने
एक विचारे, एक मताने, एक आम्ही होऊ ।। ध्रु. ।।

वारस आम्ही मैत्रेयीच्या, सरस्वती विदुषी गार्गींच्या
कणाकणाने ज्ञान वेचुनि आत्मोन्नति घडवू ।। १ ।।

शिवसंकल्पे प्रसन्न तन-मन, सजगतेत हो गुणसंवर्धन
उत्कट अस्फुट मन:शक्तीचा शोध नित्य घेऊ ।। २ ।।

लक्ष्मी अहिल्या स्फूर्तिदायिनी, आत्मबलाने बनु तेजस्विनी
पराक्रमाच्या कृति घडविण्या जिद्द मनी जागवू ।। ३ ।।

उंबरठ्याचे बंधन त्यजुनि, स्त्रीसमाज हा जागृत करुनि
किरणशलाका होऊन जगती, ज्ञानदीप चेतवू ।। ४ ।।

स्त्री शक्ति हे शस्त्र बनू दे, अनीतीचा भ्रष्टाचार वधु दे
बुद्धि, शक्ति अन् सामर्थ्याने जगन्मान्य होऊ ।। ५ ।।

**– डॉ. भाग्यश्री हर्षे**

**या पद्याची चाल ऐका आणि पद्य म्हणा!**



**पद्याचा भावार्थ :** 'स्त्रीशक्ती' हे समर्थ शस्त्र बनवून समाजात बदल घडवण्याचे स्वप्न या गीतातील कन्यका अभिमानाने मांडताना दिसतात.आमच्या सामर्थ्याचा आम्ही सार्थ अभिमान बाळगू; पण कुठलाही स्वार्थ आमच्या मनात नसेल. आत्मविश्वास असेल; पण विनम्रताही असेल. एक विचाराने, एक मताने आम्ही एकत्र येवू. ज्ञानसंपन्न होवून स्वत:ची प्रगती करू. चांगले संकल्प, निकोप शरीर आणि मन, जागरुकतेने मिळवलेले गुण आणि आजपर्यंत सूप्त असलेल्या मनोबळाचा शोध घेत आम्ही तेजस्विनी बनू. विविध क्षेत्रांत पराक्रम गाजवण्याची जिद्द मनात जागवू. ही गुणसंपदा मिळवताना आमचे आदर्श असतील मैत्रेयी, गार्गीसारख्या विद्वान स्त्रिया, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकरांसारख्या पराक्रमी स्त्रिया! अज्ञानाचा अंध:कार आम्ही किरणशलाका होऊन दूर करूच पण आमच्या एकत्रित-संघटित प्रयत्नातून भ्रष्टाचार, अनीती या विरुद्ध आम्ही आवाज उठवू. बुद्धी, शक्ती आणि सामर्थ्याने केवळ देशातच नव्हे, तर सर्व जगभरात आम्ही मान्यता मिळवू.

८ मार्च, जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने स्त्रीशक्ती संघटित करून पराक्रम घडवण्याचा संकल्प जोरकसपणे मांडणारे हे पद्य, मुलामुलींनी समान पातळीवर येऊन कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करणारे असेच आहे!

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात


# छात्र प्रबोधन

**सौर फाल्गुन, शके १९४१। वर्ष २० अंक ६**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३३२ वा अंक, वर्ष २८ अंक ८)

प्रकाशन दिनांक – सौर ११ फाल्गुन, शके १९४१/१ मार्च २०२०


## अंतरंग


४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी

५. ललित... **वसंत वैभवाचा... काळ सुखाचा*** – सुनील शिनखेडे

८. कविता... **आई*** – दुर्गेश सोनार

९. कथा... **सुशिक्षित!*** – अनु. अपर्णा नायगावकर

१४. प्रासंगिक... **प्रश्न विचारा म्हणणारी आज्जी*** – गीताली वि. मं.

१७. तयारी स्पर्धा परीक्षांची... **राष्ट्रीय डिझाइन संस्था** (National Institute of Design) – प्रसाद सांडभोर

२०. विषयांशी दोस्ती करूया... **इतिहासाचा अभ्यास कसा कराल?*** – सुहासिनी देशपांडे

२४. अभ्यासातील स्वावलंबन... **उजळणी तंत्र!** – कै. विवेक पोंक्षे

मुखपृष्ठाच्या आतील पद्य... **एक आम्ही होऊ*** – डॉ. भाग्यश्री हर्षे

**याशिवाय :** शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा... (८), बुद्धीला खुराक (१६), स्वयंशोध चाचणी, प्रतिसादी वाचकवीर व्हा...(२६)


**पानाखालील माहितीपर ओळी**
**यावर्षीचे पद्मविभूषण व पद्मभूषण** पुरस्कार प्राप्त व्यक्ती.
शेजारील QR code द्वारा त्यांची माहिती तपशीलात वाचा.

**१०० कथा वाचू या!**
**'कुमारकथा'ॲप द्वारे**

**मुखपृष्ठाविषयी**

वसंतऋतूत निसर्गातल्या विविध रंगांची फुलांच्या रूपाने होणारी उधळण अर्थात निसर्गातील रंगपंचमी आणि त्यांची चित्रलिपी जलरंगात रेखाटली आहे.

**– कुडल हिरेमठ**

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**

**⁎ या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.


ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**भेट द्या! मासिकाच्या संकेतस्थळाला!!** संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org



**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक :** शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
आश्विनी गोऱ्हे-देशपांडे

**मुखपृष्ठ –** कुडल हिरेमठ

**आतील चित्रे**
राहुल देशपांडे, भास्कर सगर



**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५



**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २०० **द्वैवार्षिक :** ₹ ४००
**त्रैवार्षिक :** ₹ ५५० **दशवार्षिक :** ₹ १७००

**या अंकाची किंमत : ₹ २०/-**

घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

**NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –**
**Account Name -** Jnana Prabodhini
**Bank Name -** Bank Of India
**Account No.-** 051510110004917
**Branch -** Shanipar, Pune
**IFSC Code -** BKID0000515
ऑनलाईन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.


छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक प्रायोजक – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे

संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

कसा सुरू आहे वार्षिक परीक्षेचा अभ्यास? तुम्ही केलेल्या नियोजनाप्रमाणे अभ्यासाची काटेकोरपणे अंमलबजावणी होते आहे ना? अभ्यासाची वेगवेगळी तंत्रे वापरा आणि तुमचा अभ्यास 'गुणवत्तापूर्ण' करा!

इकडे छात्र प्रबोधनच्या कार्यालयातील सदस्य गेले महिनाभर पुणे आणि परिसरातल्या २५ ते ३० शाळांमधून प्रत्येकी सुमारे ३ ते ४ तासांचे 'साहित्य मेळावे' घेत होते. 'छात्र प्रबोधन अंकाचा वापर अधिक गुणवत्तापूर्ण कसा करता येईल,' हे या मेळाव्यात उत्साहाने सहभागी होऊन विद्यार्थी प्रत्यक्ष अनुभवत होते. वेगवेगळ्या अशा ५ ते ६ गटात विद्यार्थी बसले होते. आणि गटागटाला वेगवेगळ्याप्रकारे, कल्पकतेने, अभिव्यक्त होण्याच्या संधी दिल्या जात होत्या. विद्यार्थ्यांच्या एका गटाला अंकातील कथेचा पूर्वार्ध सांगून कथेचा शेवट करायला सांगितला होता. नंतर प्रत्यक्ष लेखकाने केलेला त्या कथेचा शेवट वाचून दाखवण्यात आला. अजून अशा किती प्रकारे कथेचा शेवट करता येऊ शकेल, अशी चर्चा गटात रंगत होती. एका गटाला कवितेच्या काही ओळी देऊन कविता पूर्ण करायची होती. त्यानंतर अंकात आलेली ती कविता वाचून दाखवण्यात आली. एका गटाने एकांकिकेचे अभिवाचन करायचे होते, तर दुसऱ्या एका गटाने कवितेला चाल लावून तिचे सादरीकरण वर्गापुढे करायचे होते. याशिवाय विद्यार्थ्यांनी भाषिक खेळ/कोडी सोडवली तर काहींनी त्याप्रमाणे नवीन काही कोडी तयारही केली. शेवटी एक विषय देऊन २ गटामध्ये त्या विषयावर 'वाद-विवाद' स्पर्धा रंगली! अशाप्रकारे **'साहित्य मेळावे' संपन्न झाले.**

एकूण सुमारे १८०० विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग या साहित्य मेळाव्यांमधून दिसून आला. भाषेच्या समृद्धीला, कल्पकतेला, अभिव्यक्तीला चालना देणारे असे हे 'साहित्य मेळावे' दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये 'छात्र प्रबोधन'तर्फे आयोजित केले जातात. तुमच्या शाळेतल्या मराठीच्या ताईंना/ मुख्याध्यापकांना असे मेळावे तुमच्या इथे भरवण्यासाठी तुम्ही आवाहन करू शकता. त्यासाठी आवश्यक ती मदत आम्ही नक्कीच करू!

या सुट्टीत तुम्ही कोणते नवीन, वेगळे अनुभव घेणार? स्वत:च्या आवडी-निवडी-क्षमता हे लक्षात घेऊन शिबिरांची/उपक्रमांची निवड करा. मोजकीच शिबिरे करा; पण त्याची उत्तम पूर्वतयारी करा. प्रत्यक्ष शिबिरात उत्साहाने, मनापासून सहभागी व्हा, पुढाकार घ्या. आणि शिबिरानंतर शिबिरात शिकवलेल्या गोष्टींचा सराव व उपयोजन करण्यासाठी आवर्जून वेळ काढा. खऱ्या अर्थाने शिबिर पचवण्याचा प्रयत्न करा.

'छात्र प्रबोधन'तर्फे अनेक उपक्रम **'मे' महिन्यात** आयोजित केले आहेत. 'लेखन-संपादन कसे करावे' याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या या **लेखन-संपादन कार्यशाळेचे** तसेच अभिवाचनात ज्यांना रस आहे अशांसाठी मार्गदर्शन करणाऱ्या **अभिवाचन कार्यशाळेचे** आयोजन केले जाणार आहे. दोन्ही कार्यशाळा एकाचवेळी, तीन दिवसांच्या निवासी असणार आहेत. त्याशिवाय छात्र प्रबोधन कार्यालयात २० तास काम करण्याचा **'कार्यानुभवात'** सहभागी व्हा. 'छात्र प्रबोधन'तर्फे मुलांनी मुलांसाठी काढण्यात येणाऱ्या विद्यार्थी विशेषांकात देखील तुमचा सहभाग हवाच! **तपशील अंकात पान क्र. २५ वर पाहा.** तुमची सुट्टी 'अनुभव समृद्ध' करणाऱ्या या उपक्रमांची आता फक्त नोंद घ्या आणि परीक्षा संपल्यावर 'छात्र प्रबोधन' कार्यालयात संपर्क करून तुमचे नाव निश्चित करा. तोपर्यंत परीक्षेतील सुयशासाठी शुभेच्छा! अर्थात हे यश कॉपी न करता मिळवायचे आहे बरं का!


**गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या नववर्षासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!**

तुमची,
**शिल्पाताई**



**अभिमानास्पद : पद्मविभूषण : जॉर्ज फर्नांडिस** (मरणोत्तर) **: सार्वजनिक कार्य** – उद्योग, रेल्वे, संरक्षण मंत्री.

वार्षिक प्रायोजक –
- श्रीमती लीला आचवल, नाशिक
- सौ. उषा पुरंदरे, पुणे
- सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे
- एक हितचिंतक, पुणे



# वसंत वैभवाचा काळ सुखाचा...

– सुनील शिनखेडे

पूर्वीच्या काळी वडीलधारी माणसं लहानांचे फार लाड करत नसत. तेव्हा ऋतूच मुलांचे लाड करायचे, असं म्हटलं तर आज गंमत वाटेल; पण ते खरं आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी हेमंत गोविंद जोगळेकर यांच्या 'तेव्हां ना' या कवितेत म्हटल्याप्रमाणे, **'तेव्हां ना सगळे ऋतू वेगळे काढून दाखवता येत...'**

**'नेमेचि येतो मग पावसाळा...'** हे खरं व्हायचं. थंडीचा कडाका असायचा. हेमंती शीत लहर सुटायची. शिशिरातील पानगळ आणि वसंतातली नवी पालवी स्पष्टपणे जाणवायची. ग्रीष्मातले पोळणारे उन्ह जिवाची लाहीलाही करायचे. ज्येष्ठ लेखिका दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र' या पुस्तकात वर्णन केल्याप्रमाणे प्रत्येक ऋतू अनुभवता यायचा. संतुलित होतं ऋतुचक्र!!


आता बदलत्या काळात ऋतुचक्र बिघडलं आहे. फळं आणि भाज्याच नाही, तर ऋतूही बारमाही झाले आहेत. याला आपण माणसंच जबाबदार आहोत. निसर्गाचं, ऋतुचक्राचं संतुलन बिघडू न देणं आपल्याच हाती आहे.

प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असली, तरी सगळेच ऋतू सारख्याच महत्त्वाचे आहेत. ऊन, पाऊस, थंडी, वारा यांचं आपल्या जीवनातलं महत्त्व, जगायला आवश्यक अशा प्राणवायूसारखं आहे. शहरांमध्ये सिमेंटच्या जंगलात आणि चक्रव्यूहासारख्या वाहतूक कोंडीत जीव गुदमरला की, बालपणाची आणि गावाची आठवण प्राणवायू इतक्याच तीव्रतेने येते...

आमच्या गावाबाहेर



वार्षिक प्रायोजक – • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद • एक हितजिंतक, दिल्ली
• डॉ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर • सौ. सीमा परांजपे, पुणे



हमरस्त्याला देलनवाडी नावाचं खेडं होतं. तिथं एक मारुती मंदिर होतं. अंतर असावं मैलभर; पण लहान जिवांना तेही खूप वाटायचं. सुट्टीच्या दिवशी आम्ही मित्र सायकली दामटत देलनवाडी गाठायचो. लाल-तांबड्या रस्त्याच्या दुतर्फा आंब्यांची डेरेदार झाडं. रस्त्यावर झाडांनी सावली धरलेली. या मोहोरलेल्या कमानीदार झाडांखालून जाताना आंबेमोहोरांच्या दरवळानं मन ताजंतवान व्हायचं. सायकल चालवण्याचे श्रम जाणवायचे नाहीत. मारुतीच्या मंदिराजवळ पोचलं की, तिथल्या विहिरीतलं पाणी शेंदायचं. पाण्याने पोहरा जड झाला की, दोराने तो वर ओढायला सगळ्यांचे हात लागायचे. हातपाय धुवून मारुतीचं दर्शन घ्यायचं. मग मारुतीस्तोत्र म्हणून झालं की, पुन्हा घराकडे निघायची घाई.

गार वाऱ्याच्या झुळका सुखद गारवा द्यायच्या. संध्याकाळ व्हायच्या आत घर गाठायचं असायचं. देलनवाडीचं गच्च हिरवं रान, झाडा-फुलांचा हिरवा-ओला गंध मनाला उभारी आणायचा. मावळतीला लाल-तांबडा सूर्य! आमचा पाठलाग करत असल्यासारखा, अंधारही गावात पसरायचा.

डिसेंबरपासूनचे आम्हा मुलांचे दिवस बाहेर हुंदडण्याचेच असायचे. थंडी मुक्कामाला असायची. शेतात पीक काढणीचा हंगाम सुरू असायचा. पहाटे सारं रान दवानं आच्छादून जायचं आणि सोनसळी उन्हात चमचमत राहायचं. बोरं, ऊस, गाजरांचा मेवा याच दिवसांत गोडी लावायचा. तुरीच्या आणि वाटाण्याच्या शेंगा खिसे भरभरून घ्यायच्या.

पौष आणि माघ हे महिने भोगून झाले की, चाहूल लागायची ती फाल्गुनाची! वसंत वैभवाची!! माघातल्या वाऱ्यानं झाडांना ओकंबोकं केलेलं असायचं. चाफा, बदाम, शेवरी, शिरीष आणि कितीतरी झाडं मूकपणे पानं ढाळताना करुण दिसायची... आणि अचानक पानगळ सुरू असतानाच नव्या तांबूस पोपटी पानांच्या चोची फुटायच्या भुंड्या फांद्यांना. बघताबघता पुन्हा तरुण, तजेली, हिरवीगार व्हायची झाडं.

देलनवाडीला तर आम्ही सायकलने जायचो; पण एकदा त्याही पलीकडे कितीतरी



अभिमानास्पद : पद्मविभूषण : अनिरूद्ध जगन्नाथ : लोकसेवा – मॉरिशस मधील राजनीतिज्ञ.

वार्षिक प्रायोजक – • श्री. प्रमोद वासुदेव जोशी, पुणे • असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.,९८६०४०४९९०, पुणे
• बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे • श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

अंतरावर असलेल्या अड्याळ टेकडीवर आमची सहल जाणार अशी बातमी पसरली आणि आमच्यात चैतन्य संचारलं. अड्याळ टेकडी ही गर्द हिरव्या वनराईनं वेढलेली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'गुरुदेव सेवा मंडळा'चं कार्य तिथं चालायचं. 'तुकारामदादा गीताचार्य' तिथून हे कार्य चालवत असत. ग्रामस्वच्छता, ग्रामोदय, प्रार्थना, स्वावलंबन असे त्याचे ठळक विशेष. कर्मावर भर. भगवद्‌गीतेसारखी तुकडोजींनी ग्रामगीता सांगितली. अड्याळ टेकडीचा लौकिक असा होता. ऊर्जेने भारलेलं केंद्र होतं ते! आम्हा मुलांना लहान वयात त्याची जाण नव्हती. पुढे झाली. आम्ही सहल म्हणून गेलो आणि निसर्ग जवळून अनुभवला. एस. टी.ने अड्याळ टेकडी फाट्यावर उतरलं की, दोन मैल पायी चालत टेकडी चढायची.

टेकडीचा परिसर वनराईचा. सगळ्या प्रकारच्या झाडांनी समृद्ध. त्यावेळी सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते पळसाच्या झाडांनी. कारण पळस फुलला होता. केशरी-भगव्या रंगाच्या फुलांनी सारं रान भगवं दिसत होतं. पळसाची फुलं पक्ष्यांच्या चोचीसारखी असतात दिसायला. खूप आकर्षक. पळसाच्या गोलाकार पानांचा उपयोग पत्रावळीसाठी करतात आणि फुलांचा उपयोग होतो रंगांसाठी. रंगपंचमी, धुळवडीसाठी रंग खेळताना नैसर्गिक रंग तयार करायचे ते पळसाच्या फुलांपासूनच!

आपण रंग उडवून, खेळून रंगपंचमी साजरी करतो; पण एक गोष्ट लक्षात आलीय का तुमच्या? निसर्गात सदैव असते रंगपंचमी!

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचे आकाशात उमटणारे मनोहर रंग बघितले की, याची प्रचीती येते. फुला-फळांच्या बहराचेही अनोखे रंग. वसंत तर उधळणच करत असतो रंगांची. हिरव्या-पोपटी पानांच्या घटांचा नेत्रसुखद पिसाराच सृष्टीने उलगडला आहे, असं वाटावं. त्यात गुलाबी, लाल, पिवळ्या, केशरी, जांभळ्या, किरमिजी, निळ्या फुलांनी त्या पिसाऱ्याचं सौंदर्य अधिकच खुलवलेलं असतं. चिमण्या, साळुंक्या, मैना यांपासून कोकिळांपर्यंत तऱ्हेतऱ्हेच्या पक्ष्यांनी भुईशी फुगडी खेळण्यापासून ते उंच आकाशात सूर मारेपर्यंत सुस्वर दंगा चालवलेला असतो.

उन्ह झोंबरं होऊन जाणवायला सुरुवात झाली असली, तरी पहाट आल्हाददायक गारठ्याची दाट साय धरून, आपल्याला मोहित करत असते. दुपारची धग सोसून मन कासावीस झालं असतानाच, विसाव्याला आलेल्या संध्याकाळी गार झुळकांवर मन अलगद तरंगू लागतं. सृष्टीतले हवेहवेसे गंध यावेळी वाऱ्यासोबत लहरत येतात. रंग-गंधांतून सुखाची मुक्त उधळण करणाऱ्या या वसंत वैभवाशी बालपणीच घट्ट मैत्री केली की, वृत्तींमधील सकारात्मक संवेदना आयुष्यभर टवटवीत राहते!!

❖❖❖

**– सुनील शिनखेडे**
साहाय्यक संचालक,
आकाशवाणी, सोलापूर

**वाचूया**
**माहितीपर लेख – 'फूल प्रोजेक्ट'**
**संक्रांतीपासून ते पावसाळ्यापर्यंत फुलणाऱ्या फुलांची ओळख व या फुलांवर आधारित प्रकल्प**
**लेखिका – डॉ. कांचनगंगा गंधे**



**वार्षिक प्रायोजक – • श्री. शशांक चांदोरकर, पुणे • श्री. सतीश शंकर कुलकर्णी, सातारा • सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे • श्री. रवींद्र पालेकर, पुणे**

# आई

तव्यावर भाकरी परतावी तसं
भाजलं गेलेलं तिचं जगणं...

आयुष्याची चूल फुंकता
अख्खा जीव काजळून गेला
तरी ती थापटतच राहिली
डोळ्यांतल्या स्वप्नांना

आणि दळत राहिली
न संपणारं व्यथेचं दळण
घरोट्यातून सांडणारं पीठ
त्यावेळी जाणवणारी घरघर

खरंतर तिच्याच दु:खांना भरडत असते
तरीही ती कधीच दाखवत नाही
तिच्या काळजातली वेदना

ती गात राहते सुखाच्या ओव्या
दु:खाला शब्दबद्ध करत...

– **दुर्गेश सोनार,** नवी मुंबई
durgesh.sonar@gmail.com

**ऐकूया**
**या कविचे सादरीकरण**
**कविच्याच शब्दात**



## शब्द समुहाबद्दल एक शब्द लिहा...

१. दररोज प्रसिद्ध होणारे – ...........
२. दर सात दिवसांनी प्रसिद्ध होणारे – ..........
३. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे – .........
४. तीन महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे – .......
५. सहा महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे – .......
६. प्रतिवर्षी प्रसिद्ध होणारे – .................
७. ठरावीक कालानंतर प्रसिद्ध होणारे – ..........

**अभिमानास्पद : पद्‌मविभूषण : छन्नुलाल मिश्रा : कला** – किराणा व बनारस घराण्यांचे सुप्रसिद्ध गायक.

वार्षिक प्रायोजक – • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • श्री. संतोष साटम, पुणे
• श्री. साहिल कोठारी, बारामती • श्री. अमित बागाईतकर, पुणे

कथा

# सुशिक्षित!

अनुवाद –अपर्णा नायगांवकर

रंगण्णाला आपल्या कन्नड भाषेविषयी अतिशय प्रेम होतं. ती त्याची मातृभाषा होती ना! अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, त्याच्या मनात बाकीच्या भाषांबद्दल राग होता; पण रंगण्णाच्या मनात भाषेला देवाचं स्थान होतं. आपापल्या देवाविषयीचा प्रत्येकाचा आदर, भक्ती वेगवेगळी असते; पण आपल्या देवाला कमी लेखलेलं त्या भक्तांना सहन होत नाही, हे मात्र खरं. असं जर काही घडलं तर भक्त उसळून उठणारच ना?

रंगण्णाही तसाच होता. कन्नड भाषेचा कोणी अवमान करत आहे, हे लक्षात आलं की तो मुळीच गप्प बसत नसे. अगदी तावातावाने आपली बाजू मांडत असे.

एकदा असंच झालं. ती वेळच वाईट होती म्हणा. ही रंगण्णाच्या *ऑफिसमधील* गोष्ट. बोलता बोलता रंगण्णाचा *बॉस* म्हणाला, ''काय तुमची कन्नड भाषा? त्या भाषेत काय मोठं विशेष, वेगळं आहे?''

हे *बॉसचं* बोलणं रंगण्णाच्या कानावर पडलं मात्र, समोरचा माणूस आपला *बॉस* आहे, हे विसरलेल्या रंगण्णाच्या तोंडून तत्क्षणी शब्द बाहेर पडले, ''तुमच्या आईमधे तरी काय मोठं वेगळेपणा आहे हो?''

हे ऐकून रंगण्णाचा *बॉस* संतापाने थरथरायला लागला. त्या डबल *ग्रॅजुएट* असलेल्या साहेबाच्या मुठी रागाने आवळल्या गेल्या. आजूबाजूला असलेला *स्टाफ* घाबरून गेला.



**अभिमानास्पद : पद्मविभूषण : सुषमा स्वराज (मरणोत्तर): जनसेवा** – माहिती प्रसारण, दूरसंचार, आरोग्य, परराष्ट्र इ. खात्यांचे मंत्रीपद.

वार्षिक प्रायोजक – • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे • श्री. विक्रम कामठे, पुणे
• श्री. धनंजय गोखले, पुणे • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे






**अभिमानास्पद : पद्मविभूषण : विश्वेशतीर्थ स्वामीजी (मरणोत्तर): अध्यात्म –** वेदांन्ताचा अभ्यास, पूर्णप्रज्ञा विद्यापीठाचे संस्थापक.

पण रंगण्णा लगेचच भानावर आला.

''साहेब, मी तुमच्या आईबद्दल बोलल्यावर तुम्हाला माझा भयंकर राग आला, बरोबर आहे ना? माझी कन्नड भाषा मला माझ्या आईसमान आहे. कृपा करा; पण माझ्या कन्नड मातृभाषेच्या वाटेला गंमतीतसुद्धा जाऊ नका.'' डोळ्यात पाणी असलेला रंगण्णा तळमळीनं बोलत होता.

क्षणार्धात तेथील चित्र बदलून गेलं. ''*सॉरी* रंगण्णा, माझं चुकलंच.''

संतापाने लाल झालेला *बॉस* आता थंड झाला होता. ''*सॉरी*, झालं गेलं विसरून जा. प्रत्येक गावात तुझ्यासारखा एकतरी भाषाभिमानी असेल ना तर कर्नाटकात कन्नड भाषा राणीसारखी मिरवत राहील. असाच कायम भाषेचा अभिमान बाळग,'' असं म्हणत *बॉसने* रंगण्णाची पाठ थोपटली.

असा हा कन्नडप्रेमी रंगण्णा एकदा बंगळुरुमध्ये गेला होता. अंगात कडक इस्त्रीचा पांढरा *शर्ट* व काळी *पँट*, घोटून केलेली दाढी. पाहता क्षणी प्रभाव पडावा असा रुबाब. तरीही टॅक्सी-रिक्षातून प्रवास न करता रंगण्णा *सिटीबसमधून* प्रवास करत होता.

त्या दिवशी रंगण्णा बसमध्ये चढला आणि *'लेडीज'* असं इंग्रजीत लिहिलेल्या *सीटवर* जाऊन बसला. सुरुवातीला बसमध्ये चढलेल्या बायका काहीच बोलल्या नाहीत; कारण त्यांना बसायला इतरत्र जागा मिळाली होती. बस मॅजेस्टिकमधून बाहेर पडली व *कार्पोरेशन स्टॉपवर* उभी राहिली मात्र, बराच वेळ बसची वाट पाहत असलेले प्रवासी भराभर बसमध्ये घुसले. बसमधील सगळ्या *'लेडीज सीट'* भरलेल्या होत्या. उभ्या असलेल्या बायका रंगण्णाकडे डोळे वटारून पाहू लागल्या. काही तोंड फिरवून आपापसात कुजबुजू लागल्या. सगळं कळत असूनही रंगण्णा मात्र शांतपणे बसून होता.

रंगण्णाचं *लेडीज सीटवर* बसणं पुरुष प्रवाशांनाही विचित्र वाटत होतं. 'काही *मॅनर्स* आहेत की नाही या माणसाला' अशा नजरेने ते रंगण्णाकडे पाहत होते. बायका धुसफुसत उभ्या होत्या. इतक्यात एक बाई रंगण्णाकडे पाहून म्हणाली, ''सर, ही *लेडीज सीट* आहे.''

रंगण्णा आपल्याला काही ऐकूच आलं नाही अशा प्रकारे बसून होता. आपल्या बोलण्याला हा काडीचीही किंमत देत नाहीये, हे पाहून त्या बाईला भयंकर राग आला व तिला ते अपमानास्पदही वाटलं. ती ठणकावून म्हणाली, ''अहो महाशय, ही *लेडीज सीट* आहे.''

तरी रंगण्णा तसूभरही हलला नाही. इतक्यात तिकीट द्यायला *कंडक्टर* आला. त्याला पाहून ती बाई चिडून म्हणाली, ''कंडक्टर, यांना आधी इथून उठवा.''

कंडक्टर भला माणूस होता. रंगण्णाकडे पाहून शांतपणे म्हणाला, ''सर, त्या *सीटवरून* उठावं लागेल तुम्हाला.''

आता रंगण्णा वैतागला. ''मी का उठावं?'' त्याने मोठ्या आवाजात विचारलं.

''इथली पाटी दिसत नाहीये का? पाहा काय लिहिलंय ते.'' *कंडक्टर* म्हणाला.

रंगण्णाने पाटीकडे नजर टाकली आणि विचारलं, ''काय लिहिलंय तिथे?''

''ही *लेडीज सीट* आहे. तिथे बसल्याबद्दल मी तुम्हाला शंभर रुपये दंड करू शकतो. निमूटपणे उठा तिथून.'' इती कंडक्टर.

''करा दंड,'' रंगण्णा

शांतपणे म्हणाला. आता मात्र शांत असलेला *कंडक्टर* संतापला. कावळा बसायला आणि फांदी मोडायला... या म्हणीप्रमाणे योगायोगाने त्याच वेळी तीन चार तिकीट तपासनीस *बसमध्ये* चढले.

'आता याला कसा इंगा दाखवते पाहा,' असं मनात म्हणत ती बाई एका तिकीट तपासनिसाला म्हणाली, ''सर, पाहाना, हा माणूस *लेडीज सीटवर* बसला आहे. सांगूनही उठायला तयार नाही.''

रागाच्या भरात रंगण्णा 'सर' वरून 'माणूस' झाला होता.

तिकीट तपासनिसाला दंड वसूल करायला एक बकरा मिळाल्याचा आनंद झाला.

''सर, शंभर रुपये दंड भरा आणि *सीट* खाली करा.'' असं मोठ्या रुबाबात त्याने रंगण्णाला सांगितलं.

''शंभर रुपये दंड? कशासाठी?'' रंगण्णानं भोळेपणाचा आव आणत विचारलं.

'महिलांसाठी राखीव असलेल्या *सीटवर* बसल्यास शंभर रुपये दंड भरावा लागेल.' असं इंग्रजीत लिहिलेलं वाक्य तिकीट तपासनिसानं रंगण्णाला दाखवलं.





**अभिमानास्पद : पद्मभूषण : मुझफ्फर हुसेन बेग : जनसेवा** – जम्मू-काश्मीरच्या राजकारणात सक्रिय सहभाग.

**वार्षिक प्रायोजक – • श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०– २४४५०९७५/९८२२०८९४६३**
**• डॉ. नीरज रायते, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा**

‘‘हे काय आहे?’’ रंगण्णा.

‘‘असं काय, वाचूनही काय आहे म्हणून विचारत आहात? *लेडीज सीटवर* बसून तुम्ही कायद्याचं उल्लंघन केलं आहे. दंडाचे शंभर रुपये भरून टाका.’’ तिकीट तपासनीस आता चिडला होता.

‘‘पण मी कुठे *लेडीज सीटवर* बसलो आहे?’’ रंगण्णा.

‘‘अहो रावसाहेब, हे पाहा. इथे काय लिहिलं आहे? डोळे धड आहेत ना?’’ तिकीट तपासनीस म्हणाला.

‘‘हो, तिथं काहीतरी लिहिलेलं आहे खरं. परंतु मला ते समजलं नाही,’’ रंगण्णा म्हणाला.

हे ऐकून अख्ख्या बसमध्ये हास्याचा फवारा उडाला. ती चिडलेली बाईसुद्धा हसू लागली.

इतका वेळ थोडं समजुतीने घेणारा तिकीट तपासनीस आता संतापला.

‘‘ए गावंढळ, कपड्यांवरून तर अगदी साहेब दिसतो आहेस आणि *‘लेडीज’* असं लिहिलेलं समजत नाही म्हणतो आहेस? इंग्रजी वाचता येत नाही का?’’

‘‘नाही येत. काय करणार आहात?’’

‘‘अरे, काय वल्ली आहे ही? वरून चांगला सुशिक्षित दिसतोय आणि इंग्रजी येत नाही म्हणतोय.’’

‘‘ओ महाशय, सुशिक्षित माणसाला इंग्रजी आलंच पाहिजे का? इंग्रजी येत नसेल त्याला ‘अशिक्षित’ म्हणणार का? तुम्हाला चिनी भाषा येते का?’’ आता कंडक्टर व तिकीट तपासनीस गोंधळून गेले.

‘‘नाही नं येत तुम्हाला चिनी भाषा? मग तुम्हाला ‘अशिक्षित’च म्हणायला हवं ना? कर्नाटकातल्या लोकांना कन्नडच येत नसेल, तर त्यांना अशिक्षित म्हणणं योग्य ठरेल.. इंग्रजी येत नाही म्हणून नाही!! लक्षात ठेवा, कर्नाटकातील प्रत्येक माणसाला आपल्या मातृभाषेचा; म्हणजेच कन्नड भाषेचा अभिमान असायला हवा! त्याला कन्नड भाषा लिहिता, वाचता व बोलता यायला हवी. लक्षात ठेवा, फक्त कन्नडच नाही तर प्रत्येक माणसाने आपापल्या मातृभाषेचा अभिमान बाळगायला हवा आणि तिचा मानदेखील राखायला हवा.

या सूचना कन्नडमध्ये लिहिल्या असत्या, तर मी इथे बसलोच नसतो. सगळ्या सूचना कन्नड भाषेत लिहा.

मावशी, काकू, या बसा. ही *लेडीज* सीट नसती ना, तरी मी तुमच्याकरिता उठलो असतो. बायकामुलं उभी असताना स्वतः आरामात बसण्याइतका मी अशिक्षित नाही.’’

रंगण्णानी एका दमात केलेलं स्पष्टीकरण ऐकून बसमधील सगळे चकित झाले.

‘‘किती अचूक बोललात सर, लाख मोलाची गोष्ट सांगितलीत,’’ तिकीट तपासनीस अभिमानाने रंगण्णाकडे पाहात म्हणाला.

मागच्या रांगेतील एका तरुणाने, *‘‘बन्नी सर, इल्ली कुत्कोळ्ळी’* (या सर, इकडे बसा) असं म्हणत रंगण्णाला आनंदाने जागा देऊ केली...!

❖❖❖


**मूळ लेखक – कन्नड –सत्यबोध**
**मराठी अनुवाद – अपर्णा नायगांवकर**
६/१४ जवाहर सोसायटी, गोविंदनगर,
बोरीवली (वेस्ट), मुंबई 400092


**वाचूया – ललित**
**‘माझं प्रेम माझ्या भाषेवर’**
**लेखिका**
**डॉ. अश्विनी धोंगडे**



कै. विद्याताई बाळ

# विद्या बाळ : 'प्रश्न विचारा!' म्हणणारी आज्जी...

– गीताली वि. मं.

**८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने स्त्री–पुरुष संपूरकतेच्या विचारांचे जागरण आपण करत असतो. लहान वयापासूनच मुलगा आणि मुलगी म्हणून एकमेकांचा आदर करायला तुम्ही शिकलात, तर एक चांगला 'माणूस' म्हणून जगण्यास तुम्ही पात्र ठरू शकाल.**

**आयुष्यभर हे विचार समाजात रुजवण्याचा ध्यास घेऊन जगणाऱ्या ज्येष्ठ विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्या 'विद्याताई बाळ' यांचे दि. ३० जानेवारी २०२० रोजी निधन झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडणारा सोबतचा लेख वाचूया– त्यांच्या विचारांची पालखी पुढे नेणाऱ्या, त्यांच्या सुहृद गीताली वि. मं. यांच्या शब्दांत...**

---

आज्जी म्हटलं की, ऊबदार, प्रेमळ हाताची, गोष्टी सांगणारी आणि खाऊ देणारी, खरं ना? अशीच संपूर्ण समाजाची एक आज्जी होती! तिचं नाव विद्या बाळ!!

आपल्या आज्जीला वाटत असतं आपली नातवंडं मोठ्ठी व्हावीत, खूप शिकावीत, शहाणी व्हावीत, त्यांनी चांगले पैसे मिळवावेत, चांगला संसार करावा वगैरे. तसंच याही आज्जीला वाटायचं की, आपला समाज म्हणजे समाजातल्या सर्व व्यक्ती अशाच शहाण्या व्हाव्यात आणि मुख्य म्हणजे त्यांनी चांगलं 'माणूस' म्हणून लौकिक मिळवावा. अशी फक्त इच्छा–अपेक्षा करून ही आज्जी थांबली नाही, तर तिनं समाजासाठी आपलं आयुष्य वेचलं. त्या आज्जीची कै. विद्या बाळ यांची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे.

गोष्ट ऐकताना, 'असं का झालं, कुणी केलं, केव्हा केलं' असे सारखे प्रश्न विचारले, तर अनेकदा घरातली आज्जी, 'गप्प बसा रे, ऐका मी काय सांगते ते चुपचाप', असं म्हणते; पण आपली ही समाजाची आज्जी मात्र, 'प्रश्न पडू द्या, प्रश्न विचारा' असं सगळ्यांना सांगायची... त्यामुळे तिची गोष्ट वाचताना तुमच्या मनात प्रश्न उमटले तर पालकांना, शिक्षकांना बिनधास्त विचारा!

या आज्जीचा जन्म पुण्यात १२ जानेवारी १९३७ ला झाला तिचं नाव होतं सुधा केळकर. शाळेत तिचा सतत पहिला नंबर यायचा. तसंच अभिनय, खेळ, लेखन, नेतृत्वगुण यातही ती अव्वल होती, त्यामुळे ती आदर्श विद्यार्थिनी होती. पुढं तिचं लग्न झालं आणि ती नाव बदलून 'विद्या बाळ' झाली. आता तुमच्या मनात प्रश्न उगवला का? की लग्न झाल्यावर तिच्या नवऱ्याचं पण नाव बदललं का? तर त्यावर उत्तर आहे 'नाही, तिच्या नवऱ्याचं नाव नाही बदललं!' 'असं का बरं?' तर या प्रश्नाचं उत्तर पितृसत्ताक म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीत दडलेलं आहे. त्यामुळे निर्माण होणारं पुरुषांचं वर्चस्व झुगारून, स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी या आज्जीनं अहोरात्र काम केलं.

हे काम काय होतं? तर ही आज्जी सर्वांना सांगायची,



अभिमानास्पद : पद्मभूषण : मनोज दास : साहित्य-शिक्षण – उडिया आणि इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध लेखक व अध्यापक.

वार्षिक प्रायोजक – • एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ
• डॉ. विनायक देसूरकर, पुणे • डॉ. संजय गद्रे, धुळे

'मुलांना 'माणूस' म्हणून वाढवू या. मुलगा म्हणजे शूरवीर, बलवान, संरक्षण करणारा तर मुलगी म्हणजे नाजूक, सुंदर, सोशिक, फक्त घरकाम करणारी वगैरे असा विचार न करता मुलगा आणि मुलगी 'दोघं'ही माणुसकी जपणारी, चांगला विचार करणारी 'माणसं' व्हावीत, 'असा विचार सर्वांनी करायला हवा.'

तुमच्या रंगाच्या भाषेत बोलायचं म्हणजे मग मुलांना 'निळा' रंग, मुलींना 'गुलाबी' असं वर्गीकरण नको. तसंच मुलींसाठी बाहुली, भांडीकुंडी तर मुलांसाठी मोटार, बंदूका, बॅट असा खेळणी आणताना भेदभाव पण नको! गरजेप्रमाणे योग्य ते कपडे घालण्याचं स्वातंत्र्य दोघांनाही का नसावं? घराच्या दारावर नावाची पाटी बाबा किंवा आजोबांच्या नावाची असते की, आजी-आईच्या नावाची असते? आई दिवसभर घरात काम करते मग तिला पगार कोण देतं? तिला आठवड्याला कधी सुट्टी असते? असे खूप सारे प्रश्न ही आज्जी मुलांच्या शाळांमध्ये जाऊन मुला-मुलींना विचारायची... महाविद्यालयांमध्ये व्याख्यानं द्यायची, तेव्हा विचारायची. ज्येष्ठ नागरिकांच्या सभेत पण विचारायची. तिनं देश-विदेशात देखील हजारो व्याख्यानं-सभांमधून हा 'स्त्री-पुरुष समते'चा मुद्दा मांडला.

आता तुमच्या मनात असा प्रश्न आलाय ना की, 'बाई आणि पुरुष कितीतरी वेगळे दिसतात तर त्यांच्यात समता कशी असणार?' यावर ही आज्जी समजावून सांगायची की, ''समता' म्हणजे 'सारखेपणा' नाही, तर आपण सर्व स्त्री-पुरुष वेगवेगळे दिसत असलो, तरी आपण 'माणसं' आहोत. स्त्री किंवा पुरुष कुणीच श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही, म्हणजेच 'स्त्री-पुरुष समता!'

समाजात मात्र आज स्त्री-पुरुष समता नांदत नाही; कारण हजारो वर्षांपासून पितृसत्ताक-पुरुषप्रधान व्यवस्था आहे! म्हणजे काय तर जन्मल्यावर बाराव्या दिवशी बारसं होतं तेव्हा आपली 'ओळख' म्हणजे नाव कसं ठेवतात? निदान महाराष्ट्रात तरी पहिल्यांदा- आपलं नाव मग वडिलांचं नाव आणि मग वडिलांचंच आडनाव! यात आईच्या नावाचा पत्ताच नसतो. आणि लग्न झाल्यावर फक्त बाईचंच नाव बदलतं- कसं? तर वडिलांचे नाव आणि आडनावाच्या जागी नवऱ्याचं नाव आणि आडनाव! म्हणजे बाईची ओळखच बदलते. याचा अर्थ पितृ म्हणजे पित्याची सत्ता आणि पुरुषांना महत्त्व! कळलं ना आता? ही व्यवस्था बदलून स्त्री-पुरुष समतेची व्यवस्था येण्यासाठी 'त्रिनाम' पद्धतीनं नाव, लावायला सुरुवात करा. म्हणजे प्रथम तुमचं नाव मग वडिलांचं नाव आणि नंतर आईचं नाव! यामुळे तुमची लाडकी आई; जी तुमच्यासाठी दिवसभर राबते; ती तुमच्या 'ओळखीत' म्हणजे 'नावात' असेल. मी तसं नाव लावते म्हणजे गीताली विनायक मंदाकिनी... आवडली का ही त्रिनाम पद्धत?

'सौंदर्य हे बाईचं सामर्थ्य आहे आणि सामर्थ्य हे पुरुषाचं सौंदर्य!' असा एक सुविचार (?) सांगितला जातो. त्याविरुद्ध ही आज्जी लेख लिहायची, भाषणं द्यायची; कारण हा आहे स्त्री-पुरुष विषमता वाढीला लावणारा विचार! बाई गोरी म्हणजे सुंदर!! मग गोरं होण्यासाठी फे*अर अँड लव्हलीसारख्या* कितीतरी जाहिराती. म्हणजे बाई जणू वस्तू आहे; तिला नटवा-सजवा!



**वार्षिक प्रायोजक - • श्री. सागर सुराणा, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे**
**• श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.**

आणि पुरुषाला मात्र चांगलंचुंगलं खायला द्या, खेळायला द्या, त्याला बलवान करा. असं बरोबर नाही. दोघंही माणसं आहेत. दोघांनीही फक्त शरीरानं सुंदर असण्यापेक्षा 'माणूस' म्हणून चांगलं असणं गरजेचं आहे.

तुमच्या नागरिकशास्त्रात 'स्त्री आणि पुरुष भारताचे समान नागरिक आहेत', असं लिहिलंय ना? मग ते प्रत्यक्षात येण्यासाठी स्त्री-पुरुष समता सर्वात महत्त्वाची आहे. त्यासाठी दोघांनाही चांगलं 'माणूस' म्हणून घडायला हवं. चांगलं माणूस घडण्याची सुरुवात घरातून होते; म्हणून घरात लोकशाही हवी!

तुमच्या घरात लोकशाही आहे का? म्हणजे आईबाबांबरोबर एकत्र बसून तुम्ही घरातले काही निर्णय घेता? की 'तुला काय कळतंय' असं म्हणत, बाबांच्या मनासारखंच घरात नेहमी घडतं? तुम्हाला न पटलेल्या आईबाबांच्या गोष्टी तुम्ही त्यांना सांगू शकता का? तुमचं उत्तर 'हो' असेल, तर तुमच्या घरात लोकशाही आहे...!

पुढे ही आज्जी सांगायची, ''जिज्ञासा' आणि 'उत्सुकता' हे माणसाच्या वाढीसाठी महत्त्वाचे गुण आहेत. यातूनच माणसाला प्रश्न पडतात.' ते प्रश्न तुम्ही विचारणार..., त्यांची उत्तरं शोधणार..., की गप्प राहत मोठ्यांचं, परंपरेचं ऐकत जगणार? असा आंधळा आज्ञाधारकपणा चांगला नाही.

मात्र, 'प्रश्न विचारताना मोठ्यांशी उद्धटपणे वागू नका. नम्रपणेच त्यांना शंका विचारा. त्यांच्याशी प्रेमानं संवाद करा,' असं ही आज्जी बजावत असे.

आता ही आज्जी आपल्यात नाही. ३० जानेवारीला तिचं निधन झालं. तिची आठवण ताजी ठेवण्यासाठी, आपण मनात आलेले प्रश्न विचारत राहू या आणि त्यावरची उत्तरं मिळवण्याचा सतत प्रयत्न करू या!!

❖❖❖

**गीताली वि. मं.**
१-२, ५०१ कुमार प्राइडपार्क,
सेनापती बापट रस्ता, पुणे 411016

## बुद्धीला खुराक

### 'क' चे कडबोळे

**दिलेल्या अर्थाच्या मदतीने आणि 'क' या अक्षराने सुरू झालेले फक्त तीनच अक्षरी असे पुढील शब्द शोधून काढा.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१) सोनं :** | **क – –** | **२) कळी :** | **क – –** |
| **३) लेखणी :** | **क – –** | **४) पिंगटरंगी गाय :** | **क – –** |
| **५) ठराव :** | **क – –** | **६) मिळकत :** | **क – –** |
| **७) अर्धा नारळ :** | **क – –** | **८) कापडी भिंत :** | **क – –** |
| **९) लहान मुलगी :** | **क – –** | **१०) उणीव :** | **क – –** |
| **११) गुणांची पारख :** | **क – –** | **१२) संन्याशाचं वस्त्र :** | **क – –** |

**ऐकूया – कै. विद्याताई बाळ यांचे काही विचार**

**पाहूया**
**मलपृष्ठासाठी आलेली 'वसंत ऋतूत फुलणारी फुले' या विषयावर सौ. अंजली भागवत यांनी काढलेली निवडक प्रकाशचित्रे!**



**अभिमानास्पद : पद्मभूषण : कृष्णम्मल जगन्नाथन : समाजकार्य** – तामिळनाडूतील सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी.
वार्षिक प्रायोजक – • सौ. प्राची व श्री. अमर परांजपे – सांगली • सौ. मानसी मराठे, पुणे
• सौ. किरण मुसळे – कुलकर्णी, सातारा • श्री. अनिल रिसबूड, पुणे



# राष्ट्रीय डिझाइन संस्था (National Institute of Design)

या लेखातून आपण **'राष्ट्रीय डिझाइन संस्था'** उर्फ एनआयडीच्या (National Institute of Design) प्रवेशपरीक्षेबद्दल माहिती मिळविणार आहोत. *एनआयडीची* प्रवेशपरीक्षा (*डिझाइन* क्षमता चाचणी) इतर परीक्षांपेक्षा अगदी वेगळी असते. या चाचणीचं स्वरूप समजून घेण्यासाठी सर्वप्रथम आपण 'प्रवेशपरीक्षे'च्या संकल्पनेकडे एका निराळ्या चष्म्यातून पाहायला हवं. त्याही आधी आपल्याला *'डिझाइन'* म्हणजे काय? हे माहीत असायला हवं. ***डिझाइन* म्हणजे काही निव्वळ नजरेत भरणारी नक्षी नव्हे. *डिझाइन* म्हणजे कोणत्याही गोष्टीच्या घडवणुकीमागील सांगोपांग केलेला विचार आणि तिच्या रचनेसाठी केली जाणारी कृती.** *डिझाइनला* हिन्दी आणि मराठीत 'अभिकल्प' असं म्हणतात.

आपल्या आजूबाजूला जे दृश्य तसंच अदृश्य स्वरूपात असतं, ते सर्वकाही घडविण्याचं काम त्या-त्या क्षेत्रांतील तज्ज्ञ *डिझायनर* मंडळी करत असतात. हे काम करताना ते संशोधक, अभियंता आणि कलाकार अशा तिन्ही भूमिका एकाचवेळी वठवितात. त्यामुळे एका उत्तम *डिझायनरच्या* ठायी हरतऱ्हेच्या विषयांची माहिती करून घेण्याची आवड व सवय असायला हवी; तसंच मिळवलेली माहिती उपयोगात आणण्यासाठीची प्रयोगशील वृत्तीदेखील असायला हवी.

**डिझाईन क्षमता चाचणी कशासाठी?**

डिझाइन शिकण्याकरिता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये एकाचवेळी चौफेर, सांगोपांग आणि सखोल विचार करण्याचं कौशल्य किती आहे याचा अंदाज लावण्याकरिता *डिझाइन* क्षमता चाचणी घेतली जाते. विद्यार्थ्यांना आपण स्वत: केलेला विचार इतरांपर्यंत पोहोचविता येतो आहे का? हेसुद्धा या चाचणीतून पडताळण्यात येते. म्हणूनच सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे या चाचणीकडे नेहमीच्या 'प्रवेशपरीक्षे'च्या दृष्टीने पाहून चालणार नाही; कारण *डिझाइन* क्षमता चाचणीत विचारलेल्या प्रश्नांची चूक किंवा बरोबर अशी उत्तरे ठरलेली नसतात. उत्तरापेक्षा त्यामागचा विचार आणि सर्वांसमोर ते मांडण्याची शैली या बाबी महत्त्वाच्या असतात.

***डिझाइन* क्षमता चाचणीचं स्वरूप :**

एनआयडीच्या प्रवेश क्षमता चाचणीचे अर्ज दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांदरम्यान *ऑनलाईन* उपलब्ध करून दिले जातात. **चाचणी दोन टप्प्यांमध्ये घेतली जाते. त्यापैकी पहिला टप्पा** लेखी स्वरूपाचा असतो. तो देशभरातील विविध परीक्षाकेंद्रांमध्ये जानेवारी महिन्यात आयोजित केला जातो. **या टप्प्यात जे उत्तीर्ण होतात त्यांना एप्रिल -मे दरम्यान ठिकठिकाणच्या एनआयडीमध्ये चाचणीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी बोलविण्यात येते.**

**अभिमानास्पद : पद्मभूषण : वेणू श्रीनिवासन : व्यापार-उद्योग** - प्रसिद्ध उद्योगपती, टी. व्ही. एस. ग्रुपचे अध्यक्ष.

वार्षिक प्रायोजक - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • सौ. सारिका फाटक, पुणे
• श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे • डॉ. वर्षा बखले, चेंबुर, मुंबई

दोन्ही टप्पे इंग्रजी भाषेतून पार पडतात.

तुम्ही जर बारावीनंतर *बॅचलर ऑफ डिझाइन (बी. डेस.)* पदवीसाठी अर्ज करत असाल, तर तुम्हाला *डिझाइनमधील* विशिष्ट विषय निवडण्याचं स्वातंत्र्य नसतं. परंतु पदवीनंतर *मास्टर ऑफ डिझाइन (एम. डेस.)* शिक्षणासाठी अर्ज केला असल्यास, तुम्ही प्रवेशपरीक्षेकरिता सतरापैकी कोणतेही दोन विषय निवडू शकता.

*बी. डेससाठीची* पहिल्या टप्प्यातील लेखी परीक्षा सलग तीन तासांची असते. *एम डेससाठीची* लेखी परीक्षा पन्नास मिनिटांच्या दोन किंवा तीन तुकड्यांमध्ये घेतली जाते. पहिली पन्नास मिनिटे सर्वसाधारण परीक्षा होते व त्यानंतरची प्रत्येकी पन्नास मिनिटे तुम्ही निवडलेल्या विषयाशी संबंधित परीक्षेसाठी राखून ठेवलेली असतात.

प्रवेश चाचणीच्या पहिल्या टप्प्यातील लेखी परीक्षेचे दोन भाग असतात – पहिल्या भागात दिलेल्या पर्यायांमधून उत्तर निवडायला लावणारे प्रश्न विचारले जातात, तर दुसऱ्या भागात चित्रं व रेखाटनांच्या साहाय्याने उत्तरं मांडण्याचे प्रश्न विचारलेले असतात. लेखी परीक्षेसाठी *एनआयडी* कोणत्याही प्रकारचा अभ्यासक्रम प्रसिद्ध करत नाही. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमधील उपजत निरीक्षणशक्ती, आकलनशक्ती, दृष्टिकोन, संवेदनशीलता, सर्जनशीलता तपासणे या हेतूने परीक्षेच्या प्रश्नांची रचना करण्यात येते. प्रश्नरचना दरवर्षी बदलत असते. तरीही जुन्या प्रश्नपत्रिका वेळ लावून सोडविण्याचा सराव करणं निश्चितच उपयोगाचं ठरतं.

*डिझाइन* क्षमता चाचणीच्या दुसऱ्या टप्प्याला *'स्टुडिओ टेस्ट'* म्हणतात. या टप्प्यात ज्यांची निवड होते त्यांना *एनआयडीत* प्रवेश दिला जातो. ही परीक्षा प्रत्यक्ष *एनआयडीमध्ये* घेतली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना सर्वप्रथम एक मानसशास्त्रीय चाचणी सोडविण्यास दिली जाते. त्यानंतर ठरावीक साहित्य वापरून एखाद्या प्रश्नाशी किंवा संधीशी संबंधित *डिझाइन* बनविण्याचं प्रात्यक्षिक घेतलं जातं. अखेरीस प्रत्येक विद्यार्थ्याची मुलाखत घेतली जाते. विद्यार्थी त्यांचे यापूर्वीचे काम व प्रकल्प त्यावेळी परीक्षकांना दाखवू शकतात. मुलाखतीत परीक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांबद्दल, चाचण्यांमधील उत्तरांबद्दल तसंच सर्वसाधारण विचारपद्धतीबद्दल प्रश्न विचारतात.

**डिझाइन प्रवेश परीक्षांसंदर्भातील तीन गैरसमज :**

१) *डिझाइनची* परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी *स्केचिंग (रेखाटन कौशल्य) उत्कृष्ट असायला हवं.*

तुम्ही आपले विचार चित्रांच्या व मोजक्या शब्दांच्या माध्यमातून किती प्रभावीपणे मांडू शकता, हे पाहण्यात परीक्षकांना रस असतो. त्यासाठी रेखाटन कौशल्य उत्कृष्ट पातळीचं असण्याची गरज नाही. परीक्षेच्या ठरावीक वेळात सगळ्या प्रश्नांची उत्तरे पूर्ण करण्याकरिता, कमी वेळात पटापट रेखाटनं करण्याचा सराव मात्र उपयोगी पडतो. (दररोज आजूबाजूच्या सजीव व निर्जीव वस्तू, माणसे – प्राणी आदींची वेळ लावून शीघ्र रेखाटनं करत राहिल्यास, हा सराव सहज होऊन जातो.)

२) *डिझाइन* प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी *पोर्टफोलिओ* असावा लागतो व तो तयार करण्यासाठी *कोचिंग क्लास* लावणं आवश्यक असतं.

परीक्षेच्या दुसऱ्या टप्प्यातील मुलाखतीत विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकल्प व कलाकृती सादर करता येतात. या सादरीकरणांचा हेतू विद्यार्थ्यांचे कल्पक विचार व सृजनशील काम करण्याचं कौशल्य जाणून घेणं, असा असतो. त्यामुळे प्रकल्प किंवा कलाकृतीच्या गुणवत्तेपेक्षा ती घडवितानाचा प्रवास महत्त्वाचा ठरतो. असा प्रवास मांडणारे


**अभिमानास्पद : पद्मभूषण : पी. व्ही. सिंधू : क्रीडा** – बॅडमिंटन खेळात जागतिक स्तरावर अनेक पुरस्कार.

**वार्षिक प्रायोजक –** • श्री. सतीशचंद्र गोरे, पुणे • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. किशोर पंडित, चेंबुर, मुंबई • श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

- वेगवेगळ्या एनआयडीतील निरनिराळे अभ्यासक्रम, पदव्या व त्यांना अर्ज करताना आवश्यक असलेली पात्रता यांसंबंधी अधिक माहितीकरिता पाहा : <http://admissions.nid.edu/NIDA2020/Default.aspx>
- *एनआयडीच्या डिझाइन* क्षमता चाचणीच्याच धर्तीवर आयआयटी संस्थांमधील *डिझाइन* अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी UCEED व CEED या परीक्षा घेतल्या जातात. त्यांबद्दलची माहिती इथे मिळेल: <http://www.uceed.iitb.ac.in/2020/, <http://www.ceed.iitb.ac.in/2020/
- डिझाइन क्षमता चाचणीची तयारी करण्याबाबतचे सल्ले, कृती व सरावासाठीचे अभ्यास इथे मिळतील : <http://teacupblog.blogspot.com/

प्रकल्प तयार करण्यासाठी *कोचिंग क्लास* फारसा उपयोगी पडत नाही. (अनेक जणांना *पोर्टफोलिओ* न दाखविताही एनआयडीत प्रवेश मिळाला आहे!)

**३)** ***एनआयडीत प्रवेश मिळण्याकरिता विद्यार्थ्याने एकतर प्रचंड डोकेबाज असायला हवं किंवा अत्यंत नशीबवान असायला हवं.***

*एनआयडीमध्ये* 'प्रकल्प करा आणि शिका' शिक्षणपद्धती वापरली जाते. ती अंमलात आणण्यासाठी एका वर्षी निवड होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडे एका गटाच्या दृष्टिकोनातून पाहण्यात येतं. गटातील मंडळींना एकमेकांकडून शिकत समृद्ध होता यावं; म्हणून प्रवेश चाचणीच्या मदतीनं निरनिराळ्या पार्श्वभूमीच्या आणि वेगवेगळ्या प्रकारे विचार करणाऱ्या, विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्यामुळे या प्रवेशपरीक्षेत निवड न झाल्याचा अर्थ 'आपल्यात काही कमी आहे किंवा आपलं नशीब चांगलं नाही,' असा नसून 'यंदा निवड झालेल्या गटात आपला सहभाग लाक्षणिक ठरला नाही,' असा असतो.

एनआयडीत मिळणारा मुक्त रचनेचा व खुल्या विचारांचा शिक्षण-अनुभव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात कायापालट घडवून आणतो. तो अनुभव मिळवण्याची योग्यता, पडताळणाऱ्या प्रवेश चाचणीचे विविध टप्पे अनुभवणंदेखील तितकंच समृद्ध करणारं असतं. तुम्ही *डिझाइन* क्षेत्रात कामगिरी करू इच्छित असाल वा नसाल, गंमत म्हणून एखादी 'डिझाइन क्षमता चाचणी' जरूर देऊन पाहा!

❖❖❖

**प्रसाद सांडभोर,** xprsway@gmail.com

(लेखकाने अभियांत्रिकी पदवी घेतल्यानंतर NID अहमदाबाद येथून *एम. डेस.*चे शिक्षण पूर्ण केले व 'खेळ' या विषयात कल्पक काम करत आहे.)

**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अ‍ॅक्ट**
**अधिनियम ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती**
**अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)**

| | |
|---|---|
| **वृत्तपत्राचे नाव** | **: छात्र प्रबोधन** |
| **प्रसिद्धी काळ** | **: मासिक** |
| **संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे नाव व पत्ता** | **: प्रा. महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०** |
| **राष्ट्रीयत्व** | **: भारतीय** |
| **मासिकाची मालकी** | **: ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०** |

**मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.**

**पुणे**
**सौर ११ फाल्गुन, शके १९४१** **(महेन्द्र सेठिया)**
**(१ मार्च २०२०)** **संपादक, छात्र प्रबोधन**



वार्षिक प्रायोजक - • श्री. नागेश साने, पुणे • श्री. राहुल भिडे, पुणे • श्री. सचिन उल्हास गाडगीळ, पुणे



विषयांशी दोस्ती करूया!

# इतिहासाचा अभ्यास कसा कराल?

– सुहासिनी देशपांडे



इतिहास म्हणजे नुसत्या सनावळी, वंशावळी, लढाया आणि राज्यक्रांत्या... असे तुम्हापैकी काहीजणांना वाटते, हो ना? तर काहींना माहितीच्या रूक्ष मांडणीमुळे इतिहासाचा तास *बोअर* वाटतो. पण इतिहास खरंच इतका *बोअरिंग* विषय आहे का? एखाद्या विषयाकडे पाहाण्याची, अभ्यास करण्याची योग्य दृष्टी मिळाली की, नावडता विषयही आवडता होऊ शकतो.

त्यादृष्टीने इतिहासाचा अभ्यास कसा करायचा? सनावळी म्हणजे इतिहास नाही हे बरोबर आहे; पण एखादी घटना कधी घडली याची नेमकी माहिती असायला हवी आणि ती लक्षात ठेवायला हवी. मग कालरेखा तयार करू या. तुमच्या अभ्यासाच्या टेबलाच्या बाजूच्या भिंतीवर, अभ्यासाच्या एका कोपऱ्यात तुम्ही इतिहासातील कालरेखा स्वत: तयार करून लिहून ठेवा. उदाहरणार्थ, राज्यक्रांत्यांचा किंवा आधुनिक जगातील महत्त्वाच्या क्रांत्यांचा इतिहास आहे.

औद्योगिक क्रांतीने आधुनिक जगाची पहाट झाली. त्यातून वसाहतवाद-साम्राज्यवाद उदयाला आला. त्यातून अमेरिकन वसाहतींनी आपल्या इंग्रज साम्राज्यवाद्यांविरुद्ध उठाव केला. म्हणजेच अमेरिकन क्रांती! अमेरिकन क्रांतीमध्ये लढलेले फ्रेंच सैनिक, त्यांनी आपल्या देशात जाऊन राजघराणे आणि अमीर-उमरावांच्या विशेषाधिकार प्राप्त वर्गाविरुद्ध शोषित-पीडित अशा सर्वसामान्य जनांच्या अधिकारासाठी, स्वातंत्र्यासाठी क्रांती केली. जगाला 'स्वातंत्र्य-समानता-बंधुता' ही आधुनिक मूल्ये दिली. मग रशियन क्रांती, जी मार्क्सवादावर आधारित होती आणि मार्क्सवादही खरे तर, औद्योगिक क्रांतीचीच देन होती. असा एकातून दुसऱ्या, दुसऱ्यातून तिसऱ्या साखळीचा



अभिमानास्पद : पद्मभूषण : मनोहर पर्रिकर (मरणोत्तर) : जनसेवा – गोव्याचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री.

वार्षिक प्रायोजक – • कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई • श्री. संजय रिसबूड, पुणे

शोध घेत गेलो, तर आधुनिक जगात वैचारिक अभिसरण होत क्रांतीची लागण कशी पसरत गेली; हे लक्षात येईल. आणि कालरेखा तयार केली तर सनसनावळींचा बाऊ वाटणार नाही. अशा छोट्या -छोट्या घटकांच्या/उपघटकांच्यासुद्धा कालरेखा तयार करता येतील. जसे, भारतीय राष्ट्रसभेचा (काँग्रेस) इतिहास, ब्रिटिशांच्या काळातील संवैधानिक सुधारणांचा इतिहास इत्यादी.

यांशिवाय, विविध क्रांत्यांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल. उदा. अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे आणि फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे. एकाच वेळी तुलनात्मक अभ्यासाने दोन्हींचे चित्र अधिक स्पष्ट होईल आणि मग फक्त परीक्षेपुरता 'घोका आणि ओका' असे गुणांचे तात्पुरते उद्दिष्ट साध्य करण्यापुरता अभ्यास न राहता; तो कायम स्वरूपी आनंदाचा, ज्ञानाचा ठेवा तुमच्याजवळ शिदोरीसारखा राहील!

बरेचदा तुम्हाला इतिहास समजत नाही तो भूगोलाशी तुम्ही फटकून वागल्यामुळे! भूगोलाशिवाय इतिहास अधांतरी आहे. आपण डोळे झाकून चालू लागलो, तर कसे होईल? तसेच भौगोलिक संदर्भाशिवाय इतिहासात आपण चाचपडत राहतो. त्यासाठी 'नकाशावाचन' करण्याची सवय ठेवायला हवी. जमेल तितकी भटकंती करायला पाहिजे. आपापल्या शहरात/गावातसुद्धा इतिहास घडलेला, दडलेला असतो; तो जाणून घेता येईल. शिवाजी महाराजांचा इतिहास, लढाया, मोहिमा जाणून घ्यायच्या तर गड-किल्ल्यांच्या सहली, *ट्रेक्स* आयोजित होत असतात. त्याबरोबर जाऊन प्रत्यक्ष स्थळांना भेटी देता येतील. आपल्या शहरात आता इतिहास तज्ज्ञांनी आणि मार्गदर्शकांनी *हेरिटेज वॉक* सुरू केले आहेत. त्यात उत्साहाने सहभागी व्हायला हवे. शहरात ऐतिहासिक वस्तूसंग्रहालये असतात, त्यांना भेटी देऊन जाणून घेतले पाहिजे. आता शहराशहरांतून *'लाइट अ‍ॅन्ड साउंड शोज्'* तयार करून दाखविण्याची सोय झाली आहे. त्याचा फायदा आपण घेऊ शकतो. एक असा *शो* तयार करताना तज्ज्ञांनी पाच-पंचवीस संदर्भग्रंथांचा आधार घेतलेला असतो. म्हणजे इतिहास काही पाठ्यपुस्तकाच्या अर्धा सेंटीमीटर जाडीच्या नव्वद पानी पुस्तकातच मर्यादित आहे, असे समजून चालणार नाही. पाठ्यपुस्तक तुम्हाला फक्त बोट धरून थोडे थोडे मार्गदर्शन करत राहील, फार तर तुम्हाला थोडे प्रश्न विचारून तुम्ही 'बरोबर मार्गावर चालतात ना', हे लक्षात आणून देईल. (थोडे प्रश्न म्हणजेच परीक्षा-चाचण्या इ.)! आसपास, अलीकडे-पलीकडे, इकडे-तिकडे बघायला, तुमची सारी ज्ञानेंद्रिये जागी ठेवून, तुम्हालाच काम करायचे आहे. त्यासाठी अवान्तर वाचन तुमच्या कामी येईल. ऐतिहासिक कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्रे यांच्या वाचनाने आपल्या मनाच्या कक्षा वाढतील, आपले परिप्रेक्ष्य वाढेल. उदाहरणार्थ काही पुस्तके मी सुचवेन - राजा शिवछत्रपती, छावा, स्वामी, नाझी भस्मासुराचा उदयास्त, इस्रायल-युद्ध-युद्ध आणि युद्धच, इस्रायल-छळाकडून बळाकडे, क्रांतिकारकांच्या कथा (वि. श्री. जोशी), १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध..., नेताजी, पानिपत, हिटलरचे महायुद्ध... अशांसारखी तुमची पुस्तक यादी तयार करून आपले इतिहासाचे ज्ञान तुम्ही वाढवू शकाल.

तुम्ही म्हणाल, 'हे आम्ही सगळं करू; पण आम्हाला पाठ्यपुस्तक आणि त्यावर आधारित परीक्षा याला तोंड द्यायचे असते, वस्तुनिष्ठ प्रश्नातसुद्धा आम्ही मार खातो, त्याचं काय?'

त्यासाठी एका खेळाची मदत घेऊ या. *क्वीझ कॉन्टेस्ट*. इतिहासातील 'कौन बनेगा करोडपती'! तुम्ही प्रश्न तयार करा आणि त्याचे पर्याय तयार

# आनंद...

## सुरक्षित गुंतवणूकीचा ! आकर्षक व्याजदराचा !



ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्याजदर

**7.75%***

मुदत – १२ महिन्यांपुढे ते १८ महिन्यांपर्यंत

- खातेदार आपले खाते वैयक्तिक नावे अथवा संयुक्त स्वरुपात उघडू शकतो.
- देय व्याज एकत्रित, तिमाही अथवा मासिक पर्यायाने मिळू शकते.
- ओव्हरड्राफ्ट सुविधा उपलब्ध.
- नॉमिनेशन सुविधा.

सर्वसाधारण / संस्था / को-ऑप. क्रेडिट सोसायटी

**7.50%***

W.E.F.16.12.2019

* नियम व अटी लागू * ROI p.a.

## दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

*जीवन करा समृद्ध!*

महाराष्ट्र । मध्यप्रदेश । आंध्र प्रदेश । तेलंगणा । कर्नाटक । गुजरात । तामिळनाडू

**रजिस्टर्ड ऑफिस :** कॉसमॉस टॉवर, प्लॉट क्र. ६, आय.सी.एस. कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे – ४११००७. फोन : ०२०-६७०८६७०८

www.cosmosbank.com E-mail : customercare@cosmosbank.in Follow Us On :




**अभिमानास्पद : पद्मभूषण : आनंद महिंद्रा : व्यापार-उद्योग –** महिंद्रा ग्रुप या सुप्रसिद्ध उद्योगाचे अध्यक्ष.

**सर्वांगीण विकसनातून मिळवून देण्या आत्मविश्वास, 'छात्र प्रबोधन' मासिकाचा नित्य असे हा ध्यास.**

करा. पर्याय तयार करतानासुद्धा तुमच्या बुद्धीची कसोटी असते; कारण तुम्हाला पर्याय असे तयार करायचे असतात की, त्यामुळे उत्तरे देणाऱ्याचे चित्त विचलित झाले पाहिजे. त्या पर्यायांना *डिस्ट्रॅक्टर्स* म्हणतात ते याचसाठी! त्यात जो पक्का खिलाडी असतो, तो अविचलपणे सत्य किंवा अचूक पर्यायावर ठाम राहतो. आणि तुम्हाला असा पक्का खिलाडी बनायचंय. हा खेळ शाळेत मोकळ्या तासांना किंवा मुद्दाम एखाद्या इतिहासाच्या तासाला खेळता येईल. यासाठी शिक्षकांची मदत घेतली, तर मग अधिक छान!

इतिहासातला आणखी एक गोंधळ उडवून देणारा भाग म्हणजे 'कोणाचा कोण?' राजघराण्यांचा इतिहास म्हणजेच केवळ इतिहास नव्हे, असे असले तरी काही राजघराण्यांचा अभ्यास करणे भाग पडते. जसे की, मराठेशाहीतील छत्रपतींचे घराणे, पेशवाई राजवट, दिल्ली सल्तनतीचा काळ, मुघलशाही काळ वगैरे. त्यासाठी तुम्ही वंशवृक्ष तयार करू शकता आणि तो तुमच्या अभ्यासाच्या ठिकाणी लावला, तर तुमच्या लक्षात राहणे सोपे जाईल.

इतिहासाच्या अध्ययनासाठी प्रकल्प तर खूपच उपयोगी आणि *इन्टरेस्टिंग* असतात. आपल्या आवडीचा प्रकल्प निवडायचा, त्याचे उद्दिष्ट निश्चित करायचे, त्याचे स्वरूप म्हणजे- माहिती स्वरूपात धारिणी तयार करायची, की प्रतिकृती तयार करायची, की दोन अथवा अधिक विषयांशी संलग्न असा इतिहास प्रकल्प विषय निवडायचा, की कोष्टक स्वरूपात *चार्टस्* बनवायचेत, हे आपण शिक्षकांच्या मदतीने निश्चित करू शकतो. दोन-तीन विषयांशी संलग्न प्रकल्पाचे एक उदाहरण मला आठवतेय. आमच्या एका प्रतिभावान विद्यार्थ्यानं '१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील उद्रेकाची ठिकाणे' असा प्रकल्प उठाव-नकाशा आणि विजेच्या उपकरणांचा वापर करून केला होता. म्हणजे १८५७ चा इतिहास, उठावाची ठिकाणे दाखविणारा तात्कालीन भारताचा नकाशा आणि त्या-त्या ठिकाणी छोटे *बल्ब* लावून त्याची *सर्किट्स* जोडून खूप आकर्षक *कॉमेन्ट्रीद्वारे* इतिहासाचे कथन-असा तो बहुआयामी प्रकल्प त्याने केला होता.

प्रकल्पासाठी आपल्याला विविध पातळीवर काम करावे लागते. मुलाखती घेणे, वृत्तपत्रातील विशिष्ट घटनेवर येणाऱ्या बातम्यांची संग्रहवही करून चिकट पुस्तक बनवणे, शहरात चालणारी व्याख्याने ऐकणे, त्यांचे इतिवृत्त तयार करणे, संसदेतील भाषणे ऐकणे, त्यावर टिपणे तयार करणे अशाप्रकारे आपण आपली कल्पकता वापरून, छान प्रकल्प निवडून तो करू शकतो.

वरील पद्धतींचा वापर करून पाठ्यपुस्तकाचा अभ्यास तर कराच; पण आपल्या आजच्या समस्यांची उत्तरं आपल्याला इतिहासात शोधता येतात आणि आपला उज्ज्वल भविष्यकाळ घडवणं त्यामुळे शक्य होते. इतिहास म्हणजे वर्तमानाचा भूतकाळाशी चाललेला सतत संवाद आहे; ज्याचा पूल करून आपल्याला भविष्यकाळाकडे वाटचाल करायची असते. इतिहासातून स्फूर्ती घेऊन, इतिहासात घडलेल्या चुकांपासून धडे घेऊन आपल्याला आपला वर्तमानकाळ घडवायचा असतो. ही दृष्टी इतिहासाच्या अभ्यासातून आपल्याला मिळवायला हवी.

❖❖❖

**- सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्ट, रस्ता क्र. ७, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे 411038

**पाहूया - पोवाडा**
**सादरकर्ते - शाहीर विठ्ठल उमप**

**अभिमानास्पद : पद्मभूषण : त्सेरिंग लांडोल : वैद्यकशास्त्र** - लडाखमध्ये स्त्री आरोग्य विषयक कार्य.

**वार्षिक प्रायोजक -** • **श्री जगजीत कुलकर्णी, चिंचवड , पुणे**
• **श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे.** सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायं.), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

# उजळणी तंत्रे

अभ्यासातील स्वावलंबन

**वर्षभर मनापासून केलेल्या अभ्यासाचा शेवटच्या दिवसातली उजळणी हा परिपाक असतो. उजळणीमुळे हुकमी आठवायला अन् आकलनातील अचूकता वाढायला मदत होते. पाहू या काही उजळणी तंत्रे!**

**१) वाचन करताना अधोरेखन करणे :** उजळणीसाठी पुनर्वाचन करताना एखादा महत्त्वाचा शब्द, वाक्य, संदर्भ, वाक्यरचना, संकल्पना दिसली की त्याखाली पेन्सिलने रेघ मारा. एकदा संपूर्ण वाचन झाल्यानंतर २-४ दिवसांनी पुन्हा एकदा फक्त अधोरेखन केलेले वाक्य, शब्द वाचून तो धडा आपल्याला पूर्ण आठवतो का? त्या धड्यावरील प्रश्नांची उत्तरे आपल्याला लिहिता येऊ शकतील का? याचा अंदाज घ्या. काही अधिक शब्द-वाक्ये अधोरेखित करावीशी वाटल्यास तसे करा.

**२) पुनर्लेखन :** वाचन, पाठांतर यांच्याबरोबरच लेखनाचाही सराव उजळणीत व्हायलाच हवा. एक लक्षात ठेवा की, तुमची अंतिम परीक्षा लेखी परीक्षा असणार आहे. त्यामुळे नुसते वाचलेले किंवा पाठ केलेले आयत्यावेळी परीक्षेत लिहिता येईलच असे नाही. वाचलेले आठवणे, त्याची प्रश्नानुरूप मांडणी करणे व ते वही-पुस्तकाचा आधार न घेता कागदावर झरझर उतरवणे या तीनही क्रिया एकतानतेने व्हायला हव्या; तरच उत्तरपत्रिका-लेखनाचा वेग चांगला राखता येतो. यासाठी दररोज १ ते २ तास तरी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा लेखी अभ्यास व्हायलाच हवा. शक्यतो कोणत्याही प्रकारचे पुनर्लेखन उजळणी म्हणून करताना आठवूनच करावे. गरज पडेल तेव्हाच फक्त वही-पुस्तकांचा आधार घ्यावा. यातून आठवून लिहिण्याचा सरावही वाढेल.

**३) टिपणातील सारशब्द अथवा मुद्द्यांचा विस्तार करणे :** काही मोजके शब्द समोर ठेवून त्यातून एखाद्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर स्वत:च्या शब्दांमध्ये लिहिण्याचा प्रयत्न करावा.

**४) प्रश्नसंग्रह-प्रश्नसंच-प्रश्नपत्रिकांची निर्मिती व त्या सोडविणे :** उजळणी करण्यासाठी प्रश्न काढताना परीक्षेच्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ प्रश्न, लघूत्तरी प्रश्न, दीर्घोत्तरी प्रश्न असे, प्रत्येक प्रकारातील जास्तीत जास्त किती प्रश्न त्या धड्यावर विचारले जाऊ शकतील ते लिहून काढणे, विविध पुस्तकांमधूनही अशा प्रकारच्या प्रश्नांचा संग्रह करणे महत्त्वाचे आहे. असे प्रश्न काढताना आपल्याला धडा वाचावा लागतो. वही-पुस्तकाचा आधार घ्यावा लागतो. त्यातून उजळणी चांगली होते. अशा प्रश्नसंचांचा भरभर उजळणी करायलाही चांगला उपयोग होतो. त्यावेळी प्रश्नसंच भरभर अन् तोंडी सोडवावेत. छोट्या-छोट्या प्रश्नपत्रिका तयार करून व त्या सोडविण्यातून सर्वंकष उजळणी होऊ शकेल.

**५) पाठ्यपुस्तकेतर अन्य साहित्याचा वापर :** पाठ्यपुस्तकाचे वाचन सर्वात महत्त्वाचे पण ते पुन्हा पुन्हा वाचून काही वेळा कंटाळा येण्याची शक्यता असते. त्यामुळे विविध मार्गदर्शके (गाईडस्), विविध शिकवण्यांची टिपणे (नोट्स), २१ अपेक्षित इ. मिळवून वाचावे. ते वाचताना एखादा वेगळा मुद्दा सापडला तर तो आपल्या वहीमध्ये/टिपणांमध्ये अवश्य नोंदवून ठेवावा. फक्त त्यातून अभ्यासाचा गोंधळ वाढणार नाही, याची काळजी घ्यावी.

याशिवाय मनन करणे, आठवण्याचा सराव करणे. एखादा अवघड भाग दुसऱ्याला शिकवणे, समजवून सांगणे, गटात एकमेकांना प्रश्न विचारून उत्तरे देणे, दीर्घोत्तरी प्रश्नांचे उत्तर साखळी पद्धतीने गटाने पूर्ण करणे इ. तंत्रांच्याआधारे उजळणीत वैविध्य आणता येईल.

❖❖❖

**– कै. विवेक पोंक्षे**

**अभिमानास्पद : पद्मभूषण : अनिल प्रकाश जोशी : समाजकार्य** – पर्यावरण क्षेत्रात काम करणारे वनस्पती शास्त्रज्ञ.

वार्षिक प्रायोजक – • श्री. रवी बांडे, शिवापूर, पुणे • एक हितचिंतक, पुणे • डॉ. महेश बेडेकर, ठाणे

## - शब्द एक अर्थ अनेक -

### 'पैसा' अर्थात 'अर्थ'



**पैसा म्हणजे इंग्रजीत Money रोजच्या व्यवहारात अनेक ठिकाणी पैशाची 'देवाण, घेवाण' चालते, तेव्हा त्याचा 'अर्थ' वेगवेगळा असतो.**

- तुम्ही शाळेच्या कचेरीत प्रवेशासाठी 'पैसे' भरता तेव्हा ती **'फी'** असते.
- तुम्ही सरकारी परीक्षेत यश मिळवलंत तर सरकार तुम्हाला पुढील शिक्षणासाठी पैसे देते, ती **'शिष्यवृत्ती'** असते.
- 'छात्र प्रबोधन' चा अंक तुम्हाला पोस्टाने घरी मिळावा म्हणून तुम्ही कार्यालयात 'पैसे' भरता तेव्हा ती 'छात्र प्रबोधन' ची **'वर्गणी'** असते.
- लेखकाचा लेख अंकात/वर्तमानपत्रात छापून आला तर लेखकाला त्याचे पैसे मिळतात ते **'मानधन'** असतं!
- आपल्याकडे धार्मिक कार्य/पूजा सांगायला आलेल्या गुरूजींना आपण पैसे देतो ती **'दक्षिणा'** असते.
- एखादी वस्तू विकत घेतली की आपण दुकानदाराला पैसे देतो ती वस्तूची **'किंमत'** असते.
- काही पैसे/रक्कम ठरावीक दिवसांसाठी बँकेत ठेवली जाते ती **'मुदत ठेव'** असते. त्या बदल्यात बँक तुम्हाला पैसे देते ते **'व्याज'** असतं.
- कर्मचाऱ्याला त्याच्या कामाचे पैसे देतो तेव्हा तो **'पगार'** असतो.

**तुम्हाला 'पैसा' साठी अजून काही 'अर्थ' सापडतात का? मिळाले तर 'छात्र प्रबोधन' कडे पाठवा.**

आवाहन

## 'छात्र प्रबोधन'च्या उपक्रमात सहभागी व्हा...

### १) 'कार्यानुभव' घ्या... समृद्ध व्हा... (इयत्ता ७ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी)

तुमची सुट्टी अर्थपूर्ण व आनंददायी करण्यासाठी छात्र प्रबोधनच्या उपक्रमात सहभागी व्हा.

'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात या आणि कामातील 'मजा' अनुभवा!

दि. ७ ते १८ मे २०२० च्या दरम्यान ११ ते ४ या वेळात नवीन शिकण्यासाठी किमान २० तास काम करण्याची अपेक्षा! वरील उपक्रमासाठी आपली नावं 'छात्र प्रबोधन' कार्यालयात २५ एप्रिल २०२० पर्यंत नोंदवावीत. (बाहेरगावच्या विद्यार्थ्यांनी निवास-भोजनाची सोय आपापली करावी.)

### २) मुलामुलींनी, मुलामुलींसाठी तयार केलेला 'छात्र प्रबोधन'चा खास अंक!

**परीक्षा झाल्यावर सुट्टीमध्ये या विद्यार्थी विशेषांकासाठी तुमचा सहभाग हवाच !**

सुट्टीच्या दिवसात अंकाच्या संपादक मंडळात सहभागी होणार ना? लेख नक्की करणं, चित्र काढणं, प्रूफ रिडिंग करणं, वेळेचं नियोजन करणं, अंकाचं संपादन करणं या प्रक्रियेत सामील होऊन स्वत:ला समृद्ध करणार ना? त्यासाठी 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात आम्ही तुमची वाट पाहात आहोत.

**अपेक्षा –** लेखनाची आवड, १५ एप्रिल ते ५ जून या कालावधीत आठवड्याला किमान १५ तास वेळ देऊ शकणारे. **(संपादक मंडळात ५ जणांना संधी!)** शिवाय या अंकासाठी तुम्हा मुलांच्या साहित्याची, चित्रांची, मुखपृष्ठाची वाट पाहातोय. **साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख – १५ मे २०२०**

### ३) कुमारांसाठी 'मे' महिन्यात निवासी कार्यशाळा (तपशील पुढील अंकात जाहीर करू)

**लेखन-संपादन आणि अभिवाचन** या दोन्ही कार्यशाळांचे एकाचवेळी आयोजन (३ दिवसांची निवासी)

**अभिमानास्पद : पद्मभूषण: एस. सी. जमीर : जनसेवा** – अनेक राज्यात राज्यपाल म्हणून भरीव योगदान

वार्षिक प्रायोजक – • डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव
• कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे

# स्वयं शोध चाचणी १२– माझी नेतृत्व क्षमता

**या चाचणीतील प्रश्नांचे उत्तर देताना, नेहमीच /कधीतरी /क्वचित /कधीच नाही यांपैकी कोणतातरी एक पर्याय निवडा आणि त्यासाठी खालील गुण देण्याच्या पद्धतीनुसार त्या प्रश्नांपुढे गुण द्या. हे काम प्रामाणिकपणे करा. ज्या प्रश्नांबाबत तुम्ही अनुभवच घेतला नसेल तेथे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाली तर तुम्ही काय कराल? हे लक्षात घेऊन गुण द्या.**

| प्रश्न | गुण देण्याची पद्धत – नेहमीच – ४ , कधीतरी – ३, क्वचित – २ , कधीच नाही – १ | गुण |
|---|---|---|
| १) | गटाचे नेतृत्व करायला मला मनापासून आवडते का? | |
| २) | सोसायटीत एखादा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मी पुढाकार घेते/घेतो का? | |
| ३) | एखाद्या कार्यक्रमाची जबाबदारी माझ्यावर सोपविल्यास ती मी कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करते/करतो का? | |
| ४) | एखाद्या गोष्टीसाठी ५-७ जणांचा गट मी जमवू शकते/शकतो का? | |
| ५) | गटप्रमुख म्हणून काम करताना माझ्या गटातील अन्य सदस्यांचे म्हणणे मी समजून घेते/घेतो का? | |
| ६) | माझ्या वर्गातील एखाद्या गटामध्ये जर काही वाद झाला तर तो वाद सोडवण्यासाठी मी पुढाकार घेते/घेतो का? | |
| ७) | मोठ्या गटासमोर उभे राहून त्यांनी एखादी कृती करावी यासाठी मी प्रेरणादायी भाषण करू शकते/शकतो का? | |
| ८) | अडीअडचणीच्या प्रसंगांमध्ये उत्तर शोधून त्या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी माझी मदत आवर्जून घेतली जाते का? | |
| | **एकूण** | |

*** टीप – ही चाचणी विद्यार्थ्यांना स्वपरीक्षणासाठी उपयोगी पडावी, या हेतूने तयार केली असून ती परिपूर्ण व प्रमाणित नाही. या चाचणीतील नेतृत्व क्षमता विकसित होण्यासाठी, चाचणीतील एकूण गुणांनुसार काही कृतींची यादी आम्ही केली आहे. ती समजून घेण्यासाठी या ८२७५६१२४६२ भ्रमणभाषवर व्हॉटस्‌अॅप/संदेश पाठवा. त्यामध्ये पुढील मजकूर असावा.**
**(छात्र प्रबोधन/स्वयंशोध चाचणी – १२/ माझी नेतृत्व क्षमता/पूर्ण नाव/गाव/इयत्ता/चाचणी गुण/मोबाइल क्रमांक)**
**म्हणजे तुमच्या गुणांनुसार, तुम्ही कोणत्या कृती केल्याचा उपयोग होईल, त्या कृती तुम्हाला कळवण्यात येतील. त्या कृती तुम्ही आवर्जून करा व स्वत:तील क्षमता विकसित करा.**



## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २०/६)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

**या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ एप्रिल २०२० पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.**

**प्रश्नांची उत्तरे लिहा –**

१) रंगण्णांच्या मते 'अशिक्षित' कोणाला म्हणायचे? (कथा – सुशिक्षित)
२) 'निसर्गात सदैव असते रंगपंचमी' असे लेखकाला का वाटते? (लेख – वसंत वैभवाचा काळ)
३) 'प्रश्न विचार! म्हणणारी आज्जी' या लेखात विद्याताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणता पैलू ठळकपणे अधोरेखित झाला आहे?
४) 'अभ्यासातील स्वावलंबन' या सदरात उजळणीची कोणती तंत्रे सांगितली आहेत?
५) 'वेणू श्रीनिवासन' यांना पद्मभूषण कोणत्या क्षेत्रातील कामगिरीसाठी देण्यात आले?



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ फाल्गुन, शके १९४१, १ मार्च २०२० या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

# 'छात्र प्रबोधन'प्रकाशित कुमारांसाठीच्या निवडक संग्राह्य पुस्तकांचा परिचय!

## वाचलेच पाहिजे असे काही (भाग १, २ व ३)

वाचूया परिचय
ज्ञान प्रबोधिनीच्या प्रकाशनांचा!

**भाग १ –** विविध क्षेत्रामधील उच्चपदाला पोहोचलेल्या व्यक्तींची प्रेरक चरित्रे आत्मचरित्रे यांचा परिचय करून देणारे पुस्तक!(प्रकाशन वर्ष २०१७)

**भाग २ –** मराठीत लिहिल्या गेलेल्या, भाषांतरित अशा विविध विषयांवरील कथा-कादंबऱ्यांचा संक्षिप्त परिचय. (प्रकाशन वर्ष २०१८)

**भाग ३ –** ललित, माहितीपर, प्रवासवर्णन, भटकंती, नाटकं, काव्यसं-ग्रह अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील पुस्तकांच्या परिचयाचे पुस्तक! (प्रकाशन वर्ष २०१९)

प्रत्येक पुस्तकामध्ये कुमारांनी वाचावीत अशा २५ पुस्तकांचा परिचय व ५० पुस्तकांची यादी दिली आहे काय वाचावे? कोणत्या पुस्तकात काय आहे? आणि पुस्तकातील सौंदर्याचा आस्वाद कसा घ्यावा/लिहावा हे समजण्यासाठी या संचाचा निश्चित उपयोग होईल.

**संपादन :** जयश्री काटीकर **पृष्ठसंख्या :** प्रत्येकी ५६

**किंमत :** प्रत्येकी ४० रु. **आवृत्ती :** प्रथम




**३ पुस्तकांचा संच ₹ १००/-**

## कागदी हस्तकलेच्या दुनियेत/ हस्तकलांचा उत्सव/ कलेच्या विश्वात




**३ पुस्तकांचा संच ₹ १७०/-**

**'कागदी हस्तकलेच्या दुनियेत'** या पुस्तकाची ३ सहज सुलभ विभागात मांडणी केली आहे- सजावट व सुशोभन, कागद काम व कोलाज, संकीर्ण. **'हस्तकलांचा उत्सव'** पुस्तकाची विभागणी ५ भागात केली आहे – कागदकाम, ओरिगामी, आकाशकंदील, सुशोभन आणि संकीर्ण! या विभागांच्या आधारे जवळजवळ ६० कलाकृती तुम्हाला तयार करता येतील. **'कलेच्या विश्वात'** या पुस्तकात टाकाऊतून टिकाऊ, सुशोभन, आकाशकंदील, वनस्पती व फुलांच्या रचना आणि संकीर्ण अशा ५ विभागात वर्गीकरण केलेल्या अनेक कलाकृती दिल्या आहेत. कुमारांची कृतिशीलता जोपासण्यासाठी व कलानिर्मितीचा आनंद घेण्यासाठी कुमारांना ही तीनही पुस्तके उपयोगी पडतील.

**लेखक :** मधुकर पालकर **संपादन :** श्रुती जातेगावकर/शोभना साठे

**पृष्ठसंख्या अनुक्रमे :** ७२, १०४, ९६ **किंमत अनुक्रमे :** रु. ५०, ७०, ७०

**आवृत्ती :** प्रथम (२०१७)

## ललित लेखसंग्रह - अलगुज / केवड्याचं पान / बकुळफुलं

अलगुजच्या सुरांप्रमाणे पाझरणाऱ्या शब्दांची ही मैफल खास कुमार वा-चकांसाठी. अलगुजच्या मनाला भारून टाकणाऱ्या शांत मधुर सुरांप्रमाणे तसेच केवड्याच्या दरवळणाऱ्या व बकुळीच्या रेंगाळत राहणाऱ्या सुगंधाप्रमाणे या पुस्तकांतील मल्हार अरणकल्ले, मंगला गोडबोले, प्रवीण दवणे, प्रकाश संत, द. मा. मिरासदार व इतर अनेक प्रथितयश लेखकांचे ललित लेख कुमारांचे अनुभवविश्व समृद्ध करतील.

**संपादन अनुक्रमे :** वर्षा कुलकर्णी/शिल्पा कुलकर्णी

**पृष्ठसंख्या :** ८० /८०/८८ **किंमत अनुक्रमे :** रु. ५०, ५०, ६०

**आवृत्ती अनुक्रमे :** द्वितीय (२०११)/द्वितीय (२०११)/प्रथम (२०१२)




**३ पुस्तकांचा संच ₹ १४०/-**

**छात्र प्रबोधनतर्फे कुमारांसाठी एकूण ६० पुस्तके प्रकाशित – अवश्य संग्रही ठेवा!**
**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!!**

सौर फाल्गुन, शके १९४१/मार्च २०२० पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ फाल्गुन, शके १९४१/१ मार्च २०२०
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Date of posting : 1-3- 2020, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-3-2020

| सौर दिनदर्शिका शके १९४१ | | |
|---|---|---|
| | मार्च २०२० | फाल्गुन चैत्र |
| र. | 1 | फा.११ |
| सो. | 2 | १२ |
| मं. | 3 | १३ |
| बु. | 4 | १४ |
| गु. | 5 | १५ |
| शु. | 6 | १६ |
| श. | 7 | १७ |
| र. | 8 | १८ |
| सो. | 9 | १९ |
| मं. | 10 | २० |
| बु. | 11 | २१ |
| गु. | 12 | २२ |
| शु. | 13 | २३ |
| श. | 14 | २४ |
| र. | 15 | २५ |
| सो. | 16 | २६ |
| मं. | 17 | २७ |
| बु. | 18 | २८ |
| गु. | 19 | २९ |
| शु. | 20 | ३० |
| श. | 21 | चै. १ |
| र. | 22 | २ |
| सो. | 23 | ३ |
| मं. | 24 | ४ |
| बु. | 25 | ५ |
| गु. | 26 | ६ |
| शु. | 27 | ७ |
| श. | 28 | ८ |
| र. | 29 | ९ |
| सो. | 30 | १० |
| मं. | 31 | ११ |



वसंत ऋतूत फुलणारी चाफा, पळस, पांगारा यामुळे अवघी सृष्टी रंगीबेरंगी होते. या विविध फुलांचा बहर टिपला आहे.

**प्रकाशचित्रे - प्रकाश जोगळेकर**

याच विषयावरील मुलामुलींनी काढलेली निवडक प्रकाशचित्रे आतील पानावरील QR code द्वारा पाहा.

**तुम्ही टिपलेली प्रकाशचित्रे पाठवा!** ठरावीक सूत्रावर आधारित टिपलेल्या तुमच्या निवडक प्रकाशचित्रांना QR code द्वारा अंकात स्थान मिळणार! मग होताय ना सहभागी!! **आगामी महिन्याचे सूत्र आहे 'गड, किल्ले, दुर्ग'** अर्थात तुम्ही दुर्ग भटकंतीच्या दरम्यान टिपलेली गडांची वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशचित्रे! **२० मार्च २०२० पर्यंत** 'छात्र प्रबोधन'च्या मेल आयडीवर पाठवा.

**पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिनकोड क्रमांक नसल्यास तातडीने कळवा.** | **सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
% (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत :** ₹ २०
**वार्षिक वर्गणी :** ₹ २००

**प्रिय पोस्टमन,**

**हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !**

**तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,**

**तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन**